**MHNS280002862023**

**विशेष दिवाणी दावा क्र.२६७/२०२३ मधील निशाणी क्र.३१ वरील आदेश.**

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी सदरहु दाव्यात त्यांना मयत वादी गंगाधर दगडु भवार विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेट असाईड होवुन मिळणेसाठी केलेला आहे. ते असे नमुद करतात की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरूध्द खरेदीखत रद्दबातल करून मिळण्यासाठी व निरंतर ताकिद मनाई हुकूमासाठी व अन्य दादींसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील वादी गंगाधर दगडु भवार हे दि.२९/०९/२०१७ रोजी गावी मयत झाले आहे. तसेच सदर दाव्यात यापुर्वी वादीचे वडील गंगाधर दगडु भवार यांनी दिलेल्या वकिलांनी दाव्याची माहिती व तारीख दिलेली नसल्याने मुदतीत सदरचा अर्ज दाखल करून वारस रेकॉर्डवर घेणे राहुन गेले आहे. सदर दाव्याच्या अंतिम न्याय निकालाकरीता वादीचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. १अ) निवृत्ती गंगाधर भवार, उ.व.६० —मुलगा, १ब) युवराज गंगाधर भवार, उ.व. ५५ —मुलगा, १क) मंगल रमेश दोंदे, उ.व.४५ —मुलगी सर्वांचा धंदा शेती, सर्व रा. वडगांव पिंगळा, ता.सिन्नर, जि.नाशिक सदरचे मयत वादी गंगाधर दगडु भवार यांचे कायदेशीर वारस असुन त्यांना दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे मयत गंगाधर दगडु भवार यांचे वारस रेकॉडवर घेण्याकामी दाव्यात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे. तसेच वादी गंगाधर दगडु भवार यांच्या विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवुन वारस रेकॉर्डवर घेण्याबाबतची दुरूस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी

विनंती केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** याउलट प्रतिवादींतर्फे विद्वान वकीलांनी निशाणी क्र.२९ आणि नि.क्र.३१ वरील अर्जांवर त्यांचे सामाईक म्हणणे सादर करून अर्जास आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादी नमुद करतात की, अर्जात दिलेले कारण खोटे असुन ॲबेटमेंट सेट असाईड करणेची मुदत संपली आहे. तरी सदरचा अर्ज रद्द व्हावा अशी विनंती केली आहे.

**३.** मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता वादी गंगाधर दगडु भवार यांचे वारस अभिलेखावर येणे न्यायोचित ठरेल. वादीने सदर वारस अभिलेखावर घेण्यास जाणुनबुजून उशिर केलेला नाही असे कथन केले आहे. सदर कथन व प्रतिवादींचा आक्षेप विचारात घेता माझ्या मते वादीचा प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

**१.** प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.३१ मंजुर करण्यात येत आहे.

**२.** वादी गंगाधर दगडु भवार यांच्या विरूध्द झालेला दावा अबेटमेंटचा आदेश हा वादींनी प्रतिवादी यांना खर्च रक्कम रु.५००/— (पाचशे रूपये मात्र) देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

SACHIN HINDURAO KHADE
Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2026.04.28 13:55:38 +0530

ठिकाण : सिन्नर.
दिनांक : २८/०४/२०२६.

(सचिन एच. खाडे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
सिन्नर

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are same, word to word as per the original

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt. Bharati D. Uphade, Stenographer (Grade-II) |
| Name of the Court | : | Civil Judge Senior Division, Sinnar. |
| Dictated on | : | 28/04/2026 |
| Transcribed on | : | -- |
| Checked on | : | 28/04/2026 |
| Signed on | : | 28/04/2026 |
| PDF uploaded on | : | 28/04/2026 |